# बिहार मध्ये भाजप आघाडीला तुफान यश , लोकांनी यादवी नाकारली!

वर्ष | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

पुणे, लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शनिवार, दि. 15 नोव्हेंबर 2025 | mahaenews.com






## प्रशांत किशोर यांचा धुव्वा

## लाडक्या बहिणी आल्या मदतीला धावून

# बिहारमध्ये बहार, पुन्हा नितीशकुमार!

## एक्सिट पोलच्या पुढे जात भाजप आघाडीला छप्परफाड यश




| पाटणा | वृत्तसंस्था | महाईन्यूज

**संपूर्ण देशाचे लक्ष लागलेल्या बिहार विधानसभा निवडणुकीच्या आज झालेल्या मतमोजणीत अपेक्षेप्रमाणे भाजपप्रणीत एनडीए आघाडीने मोठे यश प्राप्त केले असून बिहारमध्ये बहार पुन्हा फक्त नितीशकुमार हा नारा मतदारांनी बुलंद केल्याचे दिसून आले आहे. निकालापूर्वी आलेल्या मत चाचण्यांना सुद्धा मागे सोडत भाजप आणि मित्रपक्षाने जबरदस्त मुसंडी मारली आहे.**

बिहार विधानसभेच्या २४३ जागांसाठी दोन टप्प्यात मतदान झाले ,एनडीए विरुद्ध महागठबंधन आणि प्रशांत किशोर यांचा जनसुराज पक्ष असा सामना अपेक्षित होता मात्र सकाळी निकाल येण्यास सुरुवात झाली तेव्हा भाजप आघाडीने जबरदस्त मुसंडी मारीत दुपारी १ वाजेपर्यंत १८१ जागांवर आघाडी घेतली होती तर काँग्रेस आघाडीने केवळ ४५ जागांवर आघाडी घेतली होती. यात भाजप ८५ जेडीयू ७८ लॉजपा- २१ हम -५ जागांवर पुढे होते तर काँग्रेस आघाडीत राजद ३२ ,काँग्रेस -५ व्हीआयपी -१ आणि दवे पक्ष -७ जागांवर पुढे होते. प्रशांत किशोर यांच्या जनसुराज पक्षाला दुपार पर्यंत एकही जागेवर घडी मिळू शकली नव्हती. देशात किंवा कुठल्याही राज्यात एखाद सरकार सत्तेवर असेल, तर पाच वर्षानंतर त्या सरकार विरोधात एक लाट असते. प्रस्थापित सरकार विरोधी लाट त्याला म्हणतात. अँटी इन्कम्बन्सी फॅक्टर असतो. पण भाजपचं ज्या-ज्या राज्यात सरकार आहे, तिथे मात्र या उलट ट्रेंड दिसून येतोय. पाच-दहा वर्षांनंतरही भाजप त्यांचं शासन असलेल्या राज्यांमध्ये सरकार टिकवून ठेवण्यात यशस्वी ठरतोय. भाजपला ही कला चांगल्या पद्धतीने जमली आहे. भाजपची सरकारं 15-20 वर्षांनंतरही कायम राहत असताना त्या राज्यात विरोधी पक्ष मात्र कमकुवत होतोय. महाराष्ट्रानंतर आता बिहारमध्येही तोच ट्रेंड दिसतोय. 243 सदस्यांच्या बिहार विधानसभेत पुन्हा एकदा नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखाली एनडीएचे सरकार येण्याची चिन्ह आहेत.

बिहार विधानसभा निवडणुकीतील आतापर्यंतच्या ट्रेंडवरून हेही स्पष्टं होतंय की, बिहारच्या बहुतांश जनतेने तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्री म्हणून स्वीकारण्यास नकार दिला आहे. महाआघाडीने सुरुवातीला तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार म्हणून प्रोजेक्ट केले आणि यासाठी एक औपचारिक पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. कित्येक बॅनर्सवर आणि पोस्टर्सवर फक्त तेजस्वी यादव यांचा फोटो झळकत होता, त्यात महाआघाडीच्या इतर नेत्यांचे फोटो वगळण्यात आले होते. महाआघाडीच्या संपूर्ण निवडणूक प्रचारावर नजर टाकली तर तेजस्वी यादव हेच जळी स्थळ काष्ठी पाषाणी दिसत होते. मात्र एवढ्या जास्त प्रोजेक्शननंतरही महाआघाडीची झालेली पिछेहाट पाहून हेच दिसून येतं की बिहारच्या लोकांना मुख्यमंत्री म्हणून तेजस्वी यादवयांचा चेहरा योग्य वाटत नाही.




## शिवदीप लांडे पराभूत



महाराष्ट्रातील अकोला जिल्ह्याचे सुपुत्र माजी पोलीस अधिकारी शिवदीप लांडे यांनी अररिया आणि जमालपूर या दोन मतदार संघातुन अपक्ष म्हणून निवडणूक लढवली होती ,या दोन्ही मधून त्यांचा पराभव झालं असून त्यांना दोन्ही मतदार संघात चवथ्या स्थानावर समाधान मानावे लागले. नितीशकुमार लाटेत त्यांची मोठी पडझड झाल्याचे दिसून आले.

## महत्त्वाची राज्ये भाजपच्या ताब्यात

बिहार निवडणुकीतील यशानंतर भाजप आणि एनडीए आता 18 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये सत्तेत आहे. यात उत्तर प्रदेश, उत्तराखंड, बिहार, हरियाणा, दिल्ली, राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्र, गुजरात, गोवा, ओडिशा, आंध्र प्रदेश आणि ईशान्येकडील आसाम, अरुणाचल प्रदेश, नागालँड, त्रिपुरा आणि मेघालय या राज्यांमध्ये भाजप आणि एनडीएची सत्ता आहे. यातून हे स्पष्ट होते की देशातील महत्त्वाची राज्ये ही भाजपच्या ताब्यात आहेत.

## जंगलराज नाकारले




बिहार मधील मतदारांनी अतिशय योग्य निर्णय घेत सुशासन स्वीकारले असून जंगलराज नाकारले आहे ,बिहार मधील यशाने महाराष्ट्रात सुद्धा गामी काळात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत काय होणार याचे संकेत मिळाले आहेत ,हे यश मोदीजी आणि शाह यांचे नियोजन आणि नितीशकुमार यांचे उत्तम प्रशासन यांचा विजय असल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

## समजदारीचा निर्णय



लोकांना आता रडीचे डाव नकोत तर प्रत्यक्ष विकास आणि दूरदृष्टी ठेवत काम करणारे राज्य आवडते हे बिहार मधील निकालाने सिद्ध झाले आहे ,काँग्रेस आणि राजदने अगोदरच मतचोरीची ढाल घेतली होती ,तिचाही निकाल लोकांनी लावला आहे ,हेच चित्र आता सगळीकडे दिसणार असल्याची प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## हा पांडवांचा विजय



भाजपा व मित्र पक्षांना बिहार निवडणुकीमध्ये अद्भुत पूर्व यश मिळाल्याबद्दल बिहार जनतेचे आभार व पंतप्रधान नरेंद्र मोदी व नितीश कुमार चिराग पासवान, जितेंद्र जितेन माझी, कुशवाह यांच्यावर विश्वास व्यक्त करून पाच पांडवांचा विजय असल्याची प्रतिक्रिया भाजपा प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर यांनी व्यक्त केली

## २० हार्डडिस्क, तीन लॅपटॉप जप्त

## अमेरिकेतील नागरिकांची करत होते फसवणूक

# हिंजवडीत कॉल सेंटरवर पोलिसांचा छापा


।पुणे।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**अमेरिकेतील नागरिकांची फसवणूक करणाऱ्या दोन अनधिकृत कॉल सेंटरचा सायबर पोलीस आणि गुन्हे शाखा दोनने पर्दाफाश केला आहे. लोनसाठी क्रेडिट स्कोर चांगला करून देण्याचा बहाण्याने अमेरिकन नागरिकांची फसवणूक केली जायची. याप्रकरणी कॉल सेंटर मालक आणि मॅनेजर विरुद्ध सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही कॉल सेंटरमधून २० हार्ड डिस्क आणि तीन लपटॉप जप्त करण्यात आले आहेत.**

## अमेरिकेतील नागरिकांची फसवणूक





टेकला सोल्युशन कॉल सेंटरचा मालक धंनजय साहेबराव कासार, मॅनेजर हर्षद शंकर खामकर आणि स्काय सोल्युशनचा मालक सागर कुमार यादव, मॅनेजर आनंद पंकज सिन्हा यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून अटक करण्यात आली आहे. चौघांना न्यायालयाने १८ नोव्हेंबर पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. सविस्तर माहिती अशी की, आयटी हब असलेल्या हिंजवडीतील फेज दोनमध्ये गेरा इमारतीत दोन्ही अनधिकृत कॉल सेंटर सुरू होते. ते थेट अमेरिकेतील नागरिकांशी संवाद साधायचे. अमेरिकेतील नागरिकांशी कस बोलायचं? कसा संवाद साधायचा यासाठी एक स्क्रिप्ट तयार करण्यात आली होती. तिथल्या नागरिकांचा डेटा संबंधित दोन्ही कॉल सेंटरकडे आढळून आला आहे.

त्या डेटाद्वारे तिथल्या नागरिकांशी संवाद साधून लोन मिळवून देण्याच्या आमिषाने त्यांची फसवणूक केली जायची. कम्युनिटी चॉईस फायनान्सीयल कंपनीतून बोलत असल्याचं सांगून लोनसाठी क्रेडिट स्कोर सुधारून देण्यात येईल, अस अमिश दाखवून त्यांच्याकडून वेगवेगळ्या कंपनीचे कुपन घेऊन ते डॉलरमध्ये बदलून घेत. दुसऱ्या पद्धतीने देखील अमेरिकन नागरिकांची फसवणूक केली जात होती. अमेरिकेतील मेडिकल हेल्थ डिपार्टमेंटमधून बोलत असल्याचं सांगून राउंड अप, टाल्कम पावडर, झानटॅक औषधे इत्यादी वापरतात. यामुळे काही जणांना वेगवेगळा कर्क रोग झाल्याचं पोलीस सांगतात. हेच हेरून कॉल संबंधित औषधा विरोधात कोर्टात जाऊन चांगले पैसे मिळवून देऊ अस आमिष दाखवून त्यांच्याकडून सविस्तर माहिती घेऊन ती अमेरिकेतील त्रयस्थ संस्थेला विकून त्यामाध्यमातून पैसे कमावले जात होते. अखेर या दोन्ही अनधिकृत कॉल सेंटरवर सायबर पोलीस पोलीस निरीक्षक किरण नाळे आणि गुन्हे शाखा युनिट दोन चे पोलीस निरीक्षक अरविंद पवार यांच्या टीमने छापा टाकून रंगेहाथ पकडले. दोन्ही करवाईमध्ये २० हार्डडिस्क आणि तीन लॅपटॉप पोलिसांनी जप्त केले आहेत. अमेरिकेतील नागरिकांची फसवणूक करणाऱ्या दोन अनधिकृत कॉल सेंटरचा सायबर पोलीस आणि गुन्हे शाखा दोनने पर्दाफाश केला आहे.

लोनसाठी क्रेडिट स्कोर चांगला करून देण्याचा बहाण्याने अमेरिकन नागरिकांची फसवणूक केली जायची. याप्रकरणी कॉल सेंटर मालक आणि मॅनेजर विरुद्ध सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही कॉल सेंटरमधून २० हार्ड डिस्क आणि तीन लपटॉप जप्त करण्यात आले आहेत.टेकला सोल्युशन कॉल सेंटरचा मालक धंनजय साहेबराव कासार, मॅनेजर हर्षद शंकर खामकर आणि स्काय सोल्युशनचा मालक सागर कुमार यादव, मॅनेजर आनंद पंकज सिन्हा यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून अटक करण्यात आली आहे.

चौघांना न्यायालयाने १८ नोव्हेंबर पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. सविस्तर माहिती अशी की, आयटी हब असलेल्या हिंजवडीतील फेज दोनमध्ये गेरा इमारतीत दोन्ही अनधिकृत कॉल सेंटर सुरू होते. ते थेट अमेरिकेतील नागरिकांशी संवाद साधायचे. अमेरिकेतील नागरिकांशी कस बोलायचं? कसा संवाद साधायचा यासाठी एक स्क्रिप्ट तयार करण्यात आली होती.

### वेगवेगळ्या कंपनीचे कुपन

दोन्ही कॉल सेंटरकडे आढळून आला आहे. त्या डेटाद्वारे तिथल्या नागरिकांशी संवाद साधून लोन मिळवून देण्याच्या आमिषाने त्यांची फसवणूक केली जायची. कम्युनिटी चॉईस फायनान्सीयल कंपनीतून बोलत असल्याचं सांगून लोनसाठी क्रेडिट स्कोर सुधारून देण्यात येईल, अस अमिश दाखवून त्यांच्याकडून वेगवेगळ्या कंपनीचे कुपन घेऊन ते डॉलरमध्ये बदलून घेत. दुसऱ्या पद्धतीने देखील अमेरिकन नागरिकांची फसवणूक केली जात होती.

# नवले पुलादरम्यान वाहनांचा वेग मर्यादित राहावा

## कात्रज बोगदा ते नवले पुलादरम्यान ‘रम्बल स्ट्रिप’ बसविण्याचा महापालिकेचा निर्णय

।पुणे।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**‘नवले पूल परिसरात होत असलेल्या अपघातांच्या घटनांना आळा घालण्यासाठी महापालिकेने पावले उचलली आहेत. कात्रज नवीन बोगदा ते नवले पुलादरम्यान वाहनांचा वेग मर्यादित राहावा, यासाठी ‘रम्बल स्ट्रिप’ बसविण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. या रस्त्यावर दर पाचशे मीटर अंतरावर चांगल्या दर्जाच्या रम्बल स्ट्रिप बसविण्यात येणार आहेत. यामुळे या भागात होणाऱ्या अपघातांना आळा बसेल,’ असा विश्वास महापालिका प्रशासनाने व्यक्त केला.**



नवले पुलावर झालेल्या अपघातामध्ये आठ जणांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेनंतर या भागातून ये-जा करणाऱ्या वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. नवले पुलाजवळ झालेल्या अपघाताच्या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासन, वाहतूक पोलिस अधिकारी यांची शुक्रवारी महापालिकेत बैठक झाली.

या बैठकीला महापालिका आयुक्त नवल किशोर राम, अतिरिक्त पोलिस आयुक्त मनोज पाटील यांच्यासह महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.नवले पुलाजवळ असलेल्या तीव्र उतारामुळे अवजड वाहनांचे वेगावर नियंत्रण राहत नाही. त्यामुळे बहुतांश अपघात होत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे या रस्त्यावर पाचशे मीटर अंतरावर वाहनांचा वेग नियंत्रित ठेवण्यासाठी रम्बल स्ट्रिप बसविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे,

असे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.आयुक्त राम म्हणाले,‘या रस्त्यावरील अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी तीन टप्प्यांत उपाययोजना केल्या जाणार आहेत.

### कामे पूर्ण होणे आवश्यक

वेग ६० किलोमीटरवरून ४० किलोमीटरवर आणणे. वेग मोजण्याची यंत्रणा, कॅमेरे या रस्त्यांवर बसविण्याचे नियोजन करणे. तसेच, बेकायदा पद्धतीने वाहने रस्त्यांवर उभी करणाऱ्यांवर कारवाई करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.

त्याबाबत आवश्यक त्या सूचना वाहतूक पोलिसांचे वरिष्ठ अधिकारी त्यांच्या कर्मचाऱ्यांना देणार आहेत.नवीन कात्रजचा बोगदा ते हिंजवडीदरम्यान असलेल्या पुणे बेंगळुरू रस्त्यावर होणाऱ्या वाहतूक कोंडीतून वाहनचालकांची सुटका करण्यासाठी चार सेवा रस्त्यांची कामे पूर्ण होणे आवश्यक आहे.

मावळात राजकीय 'धुसफूस'

## दिवसा स्वबळाचा नारा, रात्री युतीच्या चर्चा

# मावळात घडलंय बिघडलंय!

### उमेदवार संभ्रमात कार्यकर्ते गोंधळात , इच्छुक उमेदवारांमध्ये अनिश्चिततेचे सावट

। मावळ ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मावळातील निवडणुकीचे राजकारण दिवसेंदिवस अधिक गुंतागुंतीचे होत चालले आहे. तालुक्यातील विविध नगरपरिषद, नगरपंचायत तसेच जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकांची चाहूल लागल्यापासून राजकीय नेत्यांच्या हालचालींना अचानक वेग आला आहे..**




मात्र, या हालचालींनी मतदारांपेक्षा उमेदवारच जास्त गोंधळून गेले आहेत. दिवसा स्वबळाची गर्जना करणारे आणि रात्री मात्र गुप्तपणे युतीच्या चर्चेत मग्न असणारे नेते असा दुहेरी खेळ सध्या मावळात चांगलाच रंगू लागला आहे. महायुती आणि महाविकास आघाडी यांचे ठरलेले फॉर्म्युले येथे जणू बदलले गेले असून, दोन्ही बाजूंनी 'मावळ'साठी स्वतंत्र रचना उभी करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. यामुळे उमेदवारीच्या प्रयत्नात असलेल्या अनेक इच्छुकांची अवस्था केविलवाणी झाली आहे. काहींनी प्रचाराची तयारी सुरू केली असली तरी पक्ष निर्णय घेईपर्यंत त्यांचे भवितव्य धुसरच आहे. दरम्यान, मतदारांमध्येही या राजकीय उलथापालथीमुळे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. 'नेमके कुणावर विश्वास ठेवायचा?' हा प्रश्न अनेकांच्या चर्चेचा विषय बनला आहे. तालुक्यातील लोणावळा, तळेगाव आणि वडगाव या भागात बदलत्या समीकरणांमुळे पथनाट्याप्रमाणे रोज नवी राजकीय दृश्ये पाहायला मिळत आहेत.

मावळ तालुक्यातील दोन मोठे पक्ष अनुक्रमे भारतीय जनता पार्टी व राष्ट्रवादी काँग्रेस हे राज्यात महायुती म्हणून एकत्र असले तरी मावळ तालुक्यात या दोन पक्षांमध्ये सर्वाधिक कुरघोड्या सुरू आहेत. सार्वत्रिक निवडणुकीमध्ये भाजपाने सुरुवातीपासूनच स्वबळाचा नारा दिला होता. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने मात्र भाजपाला नमते करण्यासाठी भाजपा वगळता मावळ तालुक्यातील इतर सर्वच राजकीय पक्षांना सोबत घेऊन मावळ तालुक्यामध्ये एक परिवर्तन विकास समिती करण्याची तयारी सुरू केली होती. लोणावळा शहरामध्ये तर भाजपा वगळता इतर आठ पक्षांची मोट बांधण्याचा प्रयत्न केला, मात्र जागा वाटपामध्ये हा प्रयत्न फसला आहे. ज्या परिवर्तन समितीच्या माध्यमातून निवडणूक लढवण्याबाबत चर्चा सुरू होती त्या समितीला निवडणूक चिन्हच नसल्याने परिवर्तन मधील सर्वच उमेदवारांना वेगवेगळी चिन्हे घेऊन लढावी लागली असती अथवा कोणत्याही एका राजकीय पक्षाच्या चिन्हावर निवडणूक लढवावी लागली असते मात्र ते कोणालाही परवडणारे नसल्याने सर्वांनीच या परिवर्तन समिती मधून काढता पाय घेतल्यामुळे लोणावळ्यात परिवर्तनाचा प्रयत्न फसला. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून भाजपासोबत तालुकास्तरावर बोलणी सुरू झाली आहे.

**फॉर्मुल्यावरून वाद वाढला**

लोणावळा व तळेगाव याचा फॉर्मुला ठरला असे आमदार सुनील शेळके यांनी सांगताच, लोणावळा शहर भाजपाने याचा समाचार घेत कोणताही फॉर्मुला ठरलेला नाही अफवा पसरवण्याचे बंद करा असे स्पष्ट केले. भाजपाचे लोणावळा नगरपरिषद निवडणूक प्रभारी माजी राज्यमंत्री बाळाभाऊ भेगडे यांनी देखील असा कोणताही फॉर्मुला ठरलेला नाही. युतीची चर्चा केवळ तळेगाव पुरता होती असे म्हटल्यामुळे या चर्चेला पूर्णविराम भेटला. एकीकडे या घडामोडी घडत असताना दुसरीकडे भाजपा कडून नगराध्यक्षपदाचा संभाव्य उमेदवार व इतरदा संभाव्य नगरसेवकांची यादी देखील घोषित करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षनेदेखील आमच्याकडे 27 ठिकाणी सक्षम उमेदवार असल्याचे मदत स्वबळावर जाण्याची भूमिका बोलून दाखवली. हे होत असताना पडद्यामागे पुन्हा काही बैठक अश्रू असल्याची चर्चा सध्या लोणावळा शहरांमध्ये रंगली आहे. नेते मंडळींचे या राजकीय खेळीमुळे निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांचा जीव मात्र टांगणीला लागला आहे.

### उमेदवारांचे ठरले, प्रचार सुरु

मागील अनेक वर्षांपासून आम्ही निवडणुकीच्या प्रतीक्षा मध्ये आहे. जनतेमध्ये जाऊन काम करतो आहे. जनतेचा कौल आम्हाला आहे. आम्ही स्वबळावर लढण्यास तयार आहे असे असताना देखील केवळ विकासाच्या नावाखाली राजकीय स्वार्थ साधत लादलेले उमेदवार आम्ही मान्य करणार नाही वेळ पडली तर या राजकीय तडजोडीच्या विरोधामध्ये जाऊन निवडणूक लढू असा स्पष्ट इशारा देखील अनेक इच्छुकांनी दिला आहे. लोणावळा शहरामध्ये काँग्रेस वगळता बाकी सर्वच राजकीय पक्षांच्या उमेदवाराकडून प्रचार देखील सुरू झाला आहे. असे असताना पडद्यामागे चर्चा कशासाठी, स्पष्ट भूमिका घ्या अशी मागणी लोणावळा शहरातील सर्वच राजकीय पक्षांचे कार्यकर्ते करू लागले आहेत.

---

# पिंपरी-चिंचवडमध्ये ठाकरे+काँग्रेस "आघाडी" सर्व जागा लढवणार!

### मिशन PCMC: शिवसेना ठाकरे गटाचे शहराध्यक्ष संजोग वाघेरे यांचे सूतोवाच : पहिल्या टप्प्यातील इच्छुकांच्या मुलाखती पूर्ण

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**शहरात दोन्ही राष्ट्रवादीचे गट एकत्र येण्याच्या हालचालींनी रंग चढत असतानाच, आता शिवसेना उद्धव ठाकरे गट- मनसे आणि काँग्रेसने महापालिकेच्या सर्व जागांवर एकत्र लढण्याचा निर्धार केला आहे. त्यामुळे शिवसेना उबाठा+ मनसे+ काँग्रेस अशी "आघाडी" भाजपा आणि राष्ट्रवादीशी दोनहात करणार आहे, असे चित्र निर्माण झाले आहे.**




> महानगरपालिका निवडणूक शिवसेना ठाकरे गट+ मनसे आणि काँग्रेस एकत्रित लढण्याबाबत पक्षश्रेष्ठी निर्णय घेतली. आम्ही शहरातील सर्व 128 जागांवर उमेदवार देणार आहोत. त्याअनुशंगाने आम्ही मुलाखती सुरू केल्या आहेत. पिंपरी-चिंचवडमध्ये शिवसेनेला मानणारा मतदार वर्ग आहे. मनसे आणि काँग्रेस एकत्रित ताकद झाली, तर निश्चितपणे भाजपासमोर तगडे आव्हान उभे राहील.
> **-संजोग वाघेरे,** शहराध्यक्ष, शिवसेना उबाठा, पिंपरी-चिंचवड.

शिवसेना ठाकरे गटाचे शहराध्यक्ष संजोग वाघेरे यांनी याबाबत सूतोवाच केले. त्यांच्याकडे मावळ लोकसभा आणि पिंपरी-चिंचवड शहराची जबाबदारी आहे. शहरातील 32 प्रभागांमध्ये इच्छुकांच्या मुलाखती सुरू आहेत. वाघेरे म्हणाले की, "पहिल्या टप्प्यात इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती पूर्ण झाल्या असून, आघाडीच्या माध्यमातून सर्वच १२८ प्रभागांवर आमची लढत होणार आहे." त्यांनी पुढे म्हटले की, काँग्रेससोबत समन्वय बैठका सुरू आहेत आणि 'महाविकास आघाडी' (ठाकरे गट + मनसे + काँग्रेस + इतर पुरोगामी संघटना) म्हणून प्रत्येक प्रभागात भाजपाविरुद्ध मजबूत उमेदवार उभे करण्यात येणार आहेत.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत शिवसेना ठाकरे गट आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाने महाविकास आघाडीत एकत्रित निवडणूक लढवली. किंबहुना, विधानसभा निवडणुकीत शहरातील पिंपरी, चिंचवड आणि भोसरी अशा तिन्ही मतदार संघांमध्ये "तुतारी"च्या चिन्हावर उमेदवार देण्यात आले होते. त्याच वेळी निष्ठावंत शिवसैनिकांनी एकप्रकारे उठाव केला होता. आता आगामी महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादी शरद पवार गटाने दोन्ही राष्ट्रवादी एकत्र करण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. काँग्रेसच्या प्रदेश नेत्यांकडून दोन्ही ठाकरेंसोबत एकत्र निवडणूक लढवण्याबाबत मतभिन्नता व्यक्त केली जात आहे. राष्ट्रवादी शरद पवार गट महाविकास आघाडीला सोडून राष्ट्रवादी अजित पवार गटासोबत लढल्यास शिवसेना ठाकरे गट एकाकी पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे ठाकरे बंधू आणि काँग्रेस अशी "आघाडी" करण्याबाबत प्रदेश पातळीवर हालचालींना वेग आला आहे.



# विमान प्रवास म्हणजे आता एक दिव्यच!

**विमान प्रवास म्हणजे आता एक दिव्यच ठरत आहे. आज विमानात बसणारा प्रवासी सर्वाधिक दुर्लक्षित राहिला आहे. त्याच्यासाठीच्या सुविधा, त्याच्या सुरक्षिततेचे नियम या सगळ्याच्या अंमलबजावणीकडे फारसे लक्ष दिले जात नाही. किमान काही तास उशीर झाल्यानंतर प्रवाशांना काही सुविधा देण्याचा नियम केला गेला आहे; पण त्याची अंमलबजावणी व्यवस्थितपणे होत नाही.**

जागतिकीकरण व खुले आर्थिक धोरण स्वीकारल्यानंतर देशातील हवाई क्षेत्रामध्ये खासगी गुंतवणुकीला परवानगी देण्यात आली. याच दरम्यान मध्यमवर्गीयांच्या खिशामध्ये पैसा खुळखुळू लागला. परिणामी देशातील विमान प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या संख्येत वाढ झाली. देशातील अनेक लहान-मोठ्या शहरांमध्ये विमानतळ बांधले गेले. जुने विमानतळ अद्ययावत केले गेले. मग एका पाठोपाठ एक विमान कंपन्या निघू लागल्या. पूर्वी विमान प्रवासामध्ये मिळणारे जेवण किंवा इतर सुविधांचे मोठे अप्रूप वाटत होते. तो खर्च कमी करून थेट तिकिटांची किंमत कमी करण्याचा फंडा आला. मग तिकीट आणखी स्वस्त झाले. कळत नकळत देशातील हवाई प्रवाशांची संख्या काही पटींनी वाढू लागली. बघता बघता ती एक आवश्यक गोष्ट वाटू लागली आहे. विमानसेवेचे जाळे विस्तारत असताना, दाट धुके असले, तरीही



विमानाला उड्डाण करता यावे किंवा धावपट्टीवर सुखरूप उतरता यावे, सूर्यास्तानंतर दाट काळोखामध्ये देखील उड्डाण-लँडिंग करता यावे यासाठी तंत्रज्ञान उपलब्ध असताना भारतीय मानसिकतेनुसार त्याचे येथे नियोजन करण्यात आलेले नाही. त्यामुळे दरवर्षी दिल्लीतील धुक्याने विमानप्रवासाचे वेळापत्रकच बिघडलेले आढळते. दिल्ली आणि मुंबई ही देशातील सर्वात व्यस्त विमानतळं. या दोन्ही विमानतळांवर एक तासात सुमारे ५० विमानांचे उड्डाण होते किंवा ५० विमाने उतरतात. या दोन्ही विमानतळांचे विमानपत्रक बिघडले, की देशभरातील विमानतळांचे वेळापत्रक कोलमडते; कारण देशातील बहुतेक शहरे या दोन शहरांशी जोडलेली आहेत. सध्या हवाई प्रवास करताना तुम्ही तिकीट काढलेले विमान नक्की कधी उडेल, याचा काही अंदाज बांधता येत नाही. त्यातच विमानतळांवरील गर्दी ही एखाद्या एसटी स्टँडला लाजवेल अशी असते. त्यातच विमान उशिरा येणार असले, की ही गर्दी तुंबायला लागते. एरवी तुमच्यासाठी 'सेल'लावणाऱ्या विमान कंपन्या अशा वेळेस दाद देत नाहीत. त्यामुळे प्रवाशांचा पारा चढतो. परवा एका प्रवाश्याने थेट वैमानिकावर हात उचलल्याची घटनादेखील घडली. या घटनेचे समर्थन करता येत नसले, तरीही दहा-बारा तास उशीर झाल्यानंतर प्रवाशांची मानसिकता काय होत असेल, याचा कधी तरी कोणी तरी विचार करायला हवा हे सांगण्याची वेळ आली आहे. आज विमानात बसणारा प्रवासी सर्वाधिक दुर्लक्षित राहिला आहे. त्याच्यासाठीच्या सुविधा, त्याच्या सुरक्षिततेचे नियम या सगळ्याच्या अंमलबजावणीकडे फारसे लक्ष दिले जात नाही. किमान काही तास उशीर झाल्यानंतर प्रवाशांना काही सुविधा देण्याचा नियम केला गेला आहे; पण त्याची अंमलबजावणी होत नाही. बाहेर २० रूपयाला मिळणारी पाण्याची बाटली विमानतळावर पाचपट किमतीला का, बाहेर दहा- वीस रूपयांना मिळणारा वडापाव आत गेल्यावर एकदम २०० रूपये कसा, असे प्रश्नच तुम्ही विचारू नयेत, असेच वातावरण तयार केलेले असते. विमानतळ आणि विमानप्रवास म्हणजे सगळे पंचतारांकित! हाच नियम का, कशाला, असे विचारायला येथे बंदी आहे. विमानतळ प्रत्यक्षपणे विमान प्राधिकरणाच्या ताब्यात असले, तरीही या प्राधिकरणाचे अधिकारी किंवा कर्मचारी कोठेच दिसत नाहीत. तुम्ही समाज माध्यमावरून व्यक्त व्हा, मगच तुमची दखल घेतली जाईल, असा समज समस्त विमानतळ व्यवस्थापकांनी व विमान कंपन्यांनी करून घेतला आहे. तो कसा दूर करणार हा प्रश्न प्रवाशांना भेडसावत आहे. वास्तविक या क्षेत्रामध्ये अमाप संधी आहेत. पुढील वीस वर्षामध्ये देशामध्ये आणखी किती तरी विमानतळांची, प्रवाशांची व त्यांची वाहतूक करणाऱ्या विमानांची भर पडणार आहे. त्यातून तयार होणाऱ्या रोजगारांची संख्याही मोठी असणार आहे. मग आत्तापासूनच त्याचे योग्य नियोजन व नियमन करण्याची आवश्यकता आहे.

## प्रासंगिक »

### मुनीरशाही!

***पाकिस्तानी सैन्यदलांवर लोकनियुक्त सरकारचे आणि न्यायपालिकेचेही नियंत्रण नको, अशी तरतूद त्या देशाच्या घटनेत केली जाते आहे...***

पाकिस्तानमध्ये कोणतेही लष्करी बंड न करता, तेथील लोकनियुक्त सरकारचे अभूतपूर्व अवमूल्यन करण्याचे श्रेय त्या देशाचे लष्करप्रमुख सैयद असिम मुनीर यांना द्यावेच लागेल. मुळात पाकिस्तानात लोकशाही नेहमीच अल्पजीवी ठरते हा इतिहास आणि वर्तमान. लष्करशाही हीच त्या देशाची प्रधान ओळख. तरीदेखील आजवर लष्करी बंडांतून तेथील लोकशाहीचे आणि लोकनियुक्त राज्यकर्त्यांचे झाले नव्हते इतके वस्त्रहरण २७ वी घटनादुरुस्ती नामे तेथे सध्या सुरू असलेल्या तमाशातून झालेले दिसते. पूर्वी लोकनियुक्त राजकीय नेत्यांना कैदेत टाकून वा फासावर चढवून तेथील जनरल मंडळींची लष्करशाहीची हौस भागवली जायची. हल्ली नवीन सूत्र अंगीकारले जाते. लष्कराकडून सत्तेच्या बोहल्यावर आपल्या पसंतीच्या एखाद्या नेत्यास चढवले जाते, उपयोगमूल्य ओसरले की त्यास दूरही केले जाते. इम्रान खान यांच्या बाबतीत हेच घडले.

नेहरूंनी परराष्ट्र धोरणाचा नवा आकृतिबंध तयार करताना गौतम बुद्धांपासून ते महात्मा गांधींपर्यंत भारतीय संस्कृतीतील सर्वच विचारांचा स्वीकार करून, एक आदर्शवादी व नैतिक मूल्यांना महत्वाचे स्थान देणारा विचार पुढे आणला.

# भारतीय परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार?

हजारो वर्षांच्या राजेशाहीच्या शृंखला व जवळ-जवळ १५० वर्षांच्या ब्रिटिशांच्या जुलमी गुलामगिरीतून भारतास स्वातंत्र्य व सार्वभौम सत्ताप्राप्त झाली. अशा वेळी देशाची सर्व सूत्रे पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हातात आलेली होती. त्यावेळी पंडित जवाहरलाल नेहरूंना भारतीय संस्कृतीच्या, परंपरेच्या व महापुरुषांच्या विचारांना पायदळी तुडवत, ठराविक काही लोकांना व संस्थांना हाताशी धरून, देशाचा सर्वशक्तिमान नेता होऊन, हुकूमशहा सहज होता आले असते. परंतु त्यांच्यात असलेले महापुरुषांचे विचार व देशाबद्दलची आंतरिक आत्मीयता व प्रेम यामुळे पंडित जवाहरलाल नेहरू यांनी आदर्शवादाचा व नैतिक मूल्यांचा स्वीकार करून देशहिताला अधिकाधिक प्राधान्य दिले.दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक पटलावर अनेक बदल होऊन, जगाची एकीकडे भांडवलशाहिवादी अमेरिका व साम्यवादी रशिया अशा दोन गटांत विभागणी झाली होती, तर दुसरीकडे



नवस्वातंत्र्य प्राप्त अनेक राष्ट्रांची संख्या वाढत होती. अशाच काळात म्हणजेच १५ ऑगस्ट १९४७ राजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. देशासमोर दारिद्र्य, उपासमार, धार्मिक दंगली, औद्योगिकरण, शेतकऱ्यांचे प्रश्न, रोजगार, शिक्षण हे व असे अनेक प्रश्न आ वासून उभे होते.

अशा या परिस्थितीत नेहरूंकडे भारताची सत्ता आली होती. अशा वेळी भारतीय संस्कृती व परंपरेप्रमाणेच महापुरुषांच्या विचारांचा आदर्श घेत एका नव्या भारताच्या उभारणीसाठी आयुष्याच्या शेवटपर्यंत प्रयत्नशील राहिले.पंडित जवाहरलाल नेहरू हे जागतिक स्तरावर आणि तत्कालीन सामान्य भारतीय जनमानसात मान्यता पावलेले प्रतिभासंपन्न नेते होते. स्वातंत्र्याच्या आधीपासूनच देश-विदेशातील राजकारणामध्ये ते अतिशय सक्रिय होते. त्यांनी स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय परराष्ट्र धोरणाचा एक नवा जागतिक मान्यता प्राप्त असा आकृतिबंध तयार केला. तो करताना भारतीय संस्कृती, परंपरा व महात्मा गौतम बुद्ध ते महात्मा गांधी अशा सर्वच विचारांचा स्वीकार करून, आणला.

त्यामुळेच पंडित जवाहरलाल नेहरू हे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात. कोणतेही राष्ट्र पूर्णपणे स्वयंपूर्ण नसते. प्रत्येक राष्ट्राला आपल्या विकासासाठी व जनतेच्या हितासाठी इतर राष्ट्रांची मदत ही घ्यावीच लागत असते. त्यामुळे प्रत्येक स्वातंत्र्य व सार्वभौम राष्ट्र आपले परराष्ट्र धोरण निर्धारित करत असते. ते करत असताना राष्ट्राच्या सर्वांगीण हिताचे निर्णय घेण्याची जबादारी ही त्या-त्या देशातील शासनाची म्हणजेच शासन प्रमुखाची असते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

### ३७ बांधकामांवर हातोडा
## मुंबई महानगरपालिकेच्या 'एन' विभागाची कारवाई

# अडसर ठरलेल्या बांधकामांवर हातोडा

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**घाटकोपरमधील झुनझुनवाला महाविद्यालय ते अंधेरी-घाटकोपर जोड मार्गाच्या (एजीएलआर) रुंदीकरणामुळे बाधित होणाऱ्या ३७ बांधकामांचे मुंबई महानगरपालिकेच्या 'एन' विभाग कार्यालयाने शुक्रवार, १४ नोव्हेंबर रोजी निष्कासन केले.मुंबई महानगरपालिका आयुक्त आणि प्रशासक भूषण गगराणी यांच्या निर्देशांनुसार, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली, उपायुक्त (परिमंडळ-६) संतोषकुमार धोंडे यांच्या देखरेखीत, सहायक आयुक्त (एन विभाग) डॉ. गजानन बेल्लाळे यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली.**

### कोणत्याही स्वरुपाचे नियम नाहीत




या रुंदीकरणाच्या कामात रस्त्यालगत असलेल्या काही बांधकामांमुळे अडथळा निर्माण झाला होता. या रस्त्याच्या बांधकामामुळे बाधित झालेल्या ३७ बांधकामांचे आज निष्कासन करण्यात आले.शहरातील अनधिकृत आणि धोकादायक बांधकामांचा प्रश्न अनेक वर्षांपासून डोकेदुखी ठरला आहे. या बांधकामांमुळे शहरात घडलेल्या दुर्घटनांत आतापर्यंत शंभरहून अधिक नागरिकांनी जीव गमावला आहे. विशेषतः धामणकर नाका पटेल कम्पाउंड येथील जिलानी इमारत दुर्घटना (२१ सप्टेंबर २०२०) ही भिवंडीच्या इतिहासातील मोठी शोकांतिका ठरली, ज्यात तब्बल ३९ नागरिकांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर शहरातील अनधिकृत बांधकामांवर कारवाईचा प्रश्न ऐरणीवर आला. उच्च न्यायालयाने या संदर्भात 'सुमोटो' याचिका दाखल करत भिवंडीतील २९१ अनधिकृत इमारतींवर तातडीने कारवाई करण्याचे आदेश दिले होते. मात्र, गेल्या काही वर्षांत कारवाईचा वेग कमी झाल्याने परिस्थिती जैसे थे राहिली होती. अखेर, आयुक्त अनमोल सागर यांनी पदभार स्वीकारल्यानंतर या प्रश्नाला प्राधान्य देत सर्व संबंधित अधिकारी आणि प्रभाग अधिकाऱ्यांच्या बैठकीत स्पष्ट कृती आराखडा आखून दिला. प्रत्येक महिन्यात किमान दोन अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

त्यामुळेच, मागील काही महिन्यांत पावसाळ्यातील अडचणी असूनही महानगरपालिकेने आतापर्यंत ४२ अनधिकृत बांधकामे निष्कासित केली आहेत, तर १०० बांधकामधारकांवर पोलिसात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. भिवंडी महापालिकेच्या या कारवाईमुळे शहरातील अनधिकृत बांधकामांविरोधात नवीन शिस्त आणि जबाबदारीची भावना निर्माण होत आहे. मात्र, या मोहिमेचा परिणाम दीर्घकालीन व्हावा, यासाठी सातत्यपूर्ण आणि निष्पक्ष कारवाई होणे गरजेचे आहे.भिवंडीतील अनधिकृत आणि निकृष्ट दर्जाच्या इमारती ही नवीन बाब नाही. जवळपास प्रत्येक वर्षी मोठ्या प्रमाणावर इमारत दुर्घटना घडत आहे.

काही काळ चर्चा होते, त्यानंतर कारवाईची गती मंदावते. परिणामी, अशा इमारतींच्या दुर्घटनांचे चक्र थांबत नाही. भिवंडी ही यंत्रमाग उद्योगाची नगरी असल्याने येथे देशभरातून अनेक कामगार रोजगाराच्या शोधात येतात. या कामगारांना कमी दरात राहण्यासाठी घरांची सोय व्हावी, यासाठी अनेक बांधकाम व्यावसायिकांनी बिनअनुदानित, दर्जाहीन आणि धोकादायक इमारती उभारल्या. अनेकदा या बांधकामांमध्ये सुरक्षेचे नियम धाब्यावर बसवले जातात, ज्यामुळे दुर्घटनांची शक्यता वाढते. अनधिकृत बांधकाम निष्कासित करताना तेथे राहणाऱ्या कुटुंबांना सुरक्षितरीत्या बाहेर काढणे हे पालिकेसमोर मोठे आव्हान ठरते. अशा कारवाईदरम्यान पोलिस बंदोबस्त आवश्यक असतो;

मात्र काहीवेळा तो वेळेवर उपलब्ध न झाल्याने कारवाईला विलंब होतो. तरीदेखील, आयुक्त अनमोल सागर यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे कारवाईचा वेग लक्षणीयरीत्या वाढला आहे. घाटकोपरमधील झुनझुनवाला महाविद्यालय ते अंधेरी-घाटकोपर जोड मार्गाच्या (एजीएलआर) रुंदीकरणामुळे बाधित होणाऱ्या ३७ बांधकामांचे मुंबई महानगरपालिकेच्या 'एन' विभाग कार्यालयाने शुक्रवार, १४ नोव्हेंबर रोजी निष्कासन केले.

### पोलिस बंदोबस्त आवश्यक

मुंबई महानगरपालिका आयुक्त आणि प्रशासक भूषण गगराणी यांच्या निर्देशांनुसार, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली, उपायुक्त (परिमंडळ-६) संतोषकुमार धोंडे यांच्या देखरेखीत, सहायक आयुक्त (एन विभाग) डॉ. गजानन बेल्लाळे यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली.

## युनियनवरून ठाकरे गट-भाजप आमने-सामने

# भाजप संघटनेत सहभागी होण्यासाठी व्यवस्थापनावर दबाव

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुंबईतील वांद्रे येथील ताज लँड्स एण्ड हॉटेलातील कामगार युनियन ताब्यात घेण्यावरून शिवसेना(ठाकरे)- भाजप आमने-सामने आले आहेत. शिवसेनाप्रणीत (ठाकरे) भारतीय कामगार सेनेच्या कामगारांना भाजपप्रणीत अखिल भारतीय कर्मचारी संघटनेत सहभागी होण्यासाठी हॉटेल व्यवस्थापनाकडून येत असलेल्या दबावाच्या निषेधार्थ ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी शुक्रवारी हॉटेलवर निदर्शने केली.**

यामुळे वातावरण चांगलेच तापले. अखेर पोलिसांना मध्यस्थी करावी लागली.वांद्रे येथील पंचतारांकित ताज लँड्स एण्ड हॉटेलमध्ये आधीपासून अधिकृत मान्यता असलेली शिवसेनेची भारतीय कामगार सेना कार्यरत आहे. त्याच ठिकाणी काही दिवसांपूर्वी भाजप प्रणित अखिल भारतीय कामगार कर्मचारी संघटनेचीही स्थापना करण्यात आली . भाजपच्या या संघटनेमध्ये ठाकरे गटाच्या कामगारांची दिशाभूल करून, त्यांच्या सह्या घेऊन संघटनेत सहभागी होण्याबाबत हॉटेल प्रशासनाकडून दबाव येत होता. त्याविरोधात शुक्रवारी शिवसेना नेते, आमदार अनिल परब यांच्या नेतृत्वात शिवसेनेने ताज लँड्सबाहेर आंदोलन केले. ताज लँड हॉटेल व्यवस्थापनाला जाब विचारण्यासाठी स्वतः अनिल परब त्या ठिकाणी आले असता पोलिसांनी त्यांना अटकाव केला. पोलिसांनी हॉटेलचे मुख्य द्वार बंद केले.त्यावेळी परब यांनी पोलिसांना धारेवर धरले.



भाजपकडून हॉटेलमध्ये चुकीच्या पद्धतीने कामगार संघटना स्थापन करण्यात आली असून, त्यामध्ये शिवसेनेच्या कामगार संघटनेच्या कामगारांच्या फसवून सह्या घेण्यात आल्याचा आरोप परब यांनी केला. दरम्यान, भारतीय कामगार सेनेच्या कार्यकर्त्यांना फसवून भाजपच्या अखिल भारतीय कर्मचारी संघटनेत घेतले जात असल्याचा आरोप शिवसेना ठाकरे गटाने केला. फसवून कामगारांच्या सह्या घेतल्या जात असून चुकीच्या पद्धतीने भाजप युनियन घुसवू पाहत असल्याचा आरोप करण्यात आला. मोठ्या संख्येने शिवसैनिक हॉटेलबाहेर जमल्याने तणाव निर्माण झाला होता भाजप आमने-सामने आले आहेत. शिवसेनाप्रणीत (ठाकरे) भारतीय कामगार सेनेच्या कामगारांना भाजपप्रणीत अखिल भारतीय कर्मचारी संघटनेत सहभागी होण्यासाठी हॉटेल व्यवस्थापनाकडून येत असलेल्या दबावाच्या निषेधार्थ ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी शुक्रवारी हॉटेलवर निदर्शने केली.

### कर्मचारी संघटनेचीही स्थापना

अखेर पोलिसांना मध्यस्थी करावी लागली.वांद्रे येथील पंचतारांकित ताज लँड्स एण्ड हॉटेलमध्ये आधीपासून अधिकृत मान्यता असलेली शिवसेनेची भारतीय कामगार सेना कार्यरत आहे. त्याच ठिकाणी काही दिवसांपूर्वी भाजप प्रणित अखिल भारतीय कामगार कर्मचारी संघटनेचीही स्थापना करण्यात आली.

विनोद तावडे यांचे प्रतिपादन

## अपप्रचाराचा डाव उधळून लावण्यासाठी खेळी

# मुख्यमंत्र्यांची निवड एनडीएच्या बैठकीत होणार

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**नितीशकुमार यांचे नाव मुख्यमंत्रीपदासाठी जाहीर केले असते, तर विरोधकांनी त्यांच्या आजारपणावरुन अपप्रचार केला असता, हा डाव उधळून लावण्यासाठी आम्ही रालोआच्या (एनडीए) मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर केला नाही, असे प्रतिपादन भाजपचे केंद्रीय सरचिटणीस आणि बिहारचे प्रभारी विनोद तावडे यांनी ' लोकसत्ता ' शी बोलताना केले. मुख्यमंत्रीपदाच्या उमेदवाराची निवड एनडीएच्या संसदीय पक्षाच्या बैठकीत केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे बिहारच्या मुख्यमंत्रीपदाची माळ नितीशकुमार की अन्य कोणाच्या गळ्यात पडणार, याबाबत तर्कवितर्क सुरु झाले आहेत.**

## मुख्यमंत्र्यांची निवड बैठकीत



### किशोर यांना उत्तरच दिले नाही

मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी भाजपची साथ सोडून लालूप्रसाद यादव यांच्याबरोबर सरकार स्थापन केले, तेव्हा भाजपने तावडे यांच्यावर बिहारची जबाबदारी सोपविली होती. तावडे यांनी अडीच वर्षे बिहारमध्ये तळ ठोकला. नितीशकुमार यांना पुन्हा एनडीए बरोबर आणणे, लोकसभा निवडणुकीत ४० पैकी ३० जागा मिळविणे आणि विधानसभा निवडणुकीआधी जनहिताच्या मोठ्या योजना अंमलात आणण्यात तावडे यांचाही सहभाग आहे. एनडीएच्या जागावाटपाच्या बैठकीत कोणत्या समाजाचा उमेदवार दिल्यास तो निवडून होईल.

बिहारमध्ये एनडीएच्या घवघवीत यशामध्ये महाराष्ट्रातील तावडे यांचाही मोठा वाटा आहे. बिहारमधील प्रचंड यशामागे कोणती रणनीती होती व त्याची अंमलबजावणी कशाप्रकारे करण्यात आली, याविषयी तावडे यांनी माहिती दिली. मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी भाजपची साथ सोडून लालूप्रसाद यादव यांच्याबरोबर सरकार स्थापन केले, तेव्हा भाजपने तावडे यांच्यावर बिहारची जबाबदारी सोपविली होती. तावडे यांनी अडीच वर्षे बिहारमध्ये तळ ठोकला. नितीशकुमार यांना पुन्हा एनडीए बरोबर आणणे, लोकसभा निवडणुकीत ४० पैकी ३० जागा मिळविणे आणि विधानसभा निवडणुकीआधी जनहिताच्या मोठ्या योजना अंमलात आणण्यात तावडे यांचाही सहभाग आहे. एनडीएच्या जागावाटपाच्या बैठकीत कोणत्या समाजाचा उमेदवार दिल्यास तो निवडून होईल, हे निश्चित करुन आणि विजयी होणारा उमेदवार कोणत्या पक्षाकडे आहे.

हे पाहून एनडीएचे जागावाटप करण्यात आले होते. बिहार निवडणुकीत जनसुराज्य पक्षाच्या माध्यमातून प्रशांत किशोर मोठे आव्हान उभे करतील, अशी भीती अनेकांनी व्यक्त केली होती. पण प्रशांत किशोर यांचा करिष्मा चालणार नाही. ते केवळ समाजमाध्यमांवर प्रभावी आहेत, ते जनतेपर्यंत पोचू शकणार नाहीत, अशी खात्री एनडीएला होती. त्यामुळे प्रशांत किशोर यांच्या टीकेला उत्तर न देण्याची रणनीती एनडीएने आखली होती. एनडीएला मिळालेल्या जागांपैकी ३० मुस्लिम बहुल मतदारसंघ आहेत, ६० मतदारसंघांमध्ये अनुसूचित जातींच्या समाजाची लोकसंख्या मोठी आहे, तर ११० जागा अतिमागास किंवा अविकसित क्षेत्रातील आहेत. याचा अर्थ बिहारच्या जनतेने जातीपातीच्या राजकारणाबाहेर जावून एनडीएला मतदान केले आहे. त्याचे श्रेय भाजपने केलेल्या जातीपातीच्या राजकारणातून बाहेर पडून विकासासाठी केलेल्या प्रचाराला आहे.

भाजपने ' रफ्तार पकड चुका है बिहार ' ही टॅगलाईन घेतली होती. त्यामुळे निवडणुकीतील चर्चा जातीवरुन विकासाच्या मुद्द्यावर गेली आणि बिहार जातीय राजकारणातून बाहेर पडून विकासाच्या मार्गावर गेला आहे, असे तावडे यांनी सांगितले.नितीशकुमार यांचे नाव मुख्यमंत्रीपदासाठी जाहीर केले असते, तर विरोधकांनी त्यांच्या आजारपणावरुन अपप्रचार केला असता, हा डाव उधळून लावण्यासाठी आम्ही रालोआच्या (एनडीए) मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर केला नाही, असे प्रतिपादन भाजपचे केंद्रीय सरचिटणीस आणि बिहारचे प्रभारी विनोद तावडे यांनी ' लोकसत्ता ' शी बोलताना केले. मुख्यमंत्रीपदाच्या उमेदवाराची निवड एनडीएच्या संसदीय पक्षाच्या बैठकीत केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे बिहारच्या मुख्यमंत्रीपदाची माळ नितीशकुमार की अन्य कोणाच्या गळ्यात पडणार, याबाबत तर्कवितर्क सुरु झाले आहेत. बिहारमध्ये एनडीएच्या घवघवीत यशामध्ये महाराष्ट्रातील तावडे यांचाही मोठा वाटा आहे. बिहारमधील प्रचंड यशामागे कोणती रणनीती होती व त्याची अंमलबजावणी कशाप्रकारे करण्यात आली, याविषयी तावडे यांनी माहिती दिली.

# 'मोदींच्या हनुमाना'ची आश्चर्यकारक कामगिरी

## चिराग पासवान यांच्या पक्षाची 29 पैकी 21 जागांवर आघाडी

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**बिहार विधानसभा निवडणुकीच्या निकालाचे सुरुवातीचे कल हाती आले असून एनडीए मोठ्या विजयाच्या दिशेने वाटचाल करत आहे आणि चिराग पासवान यांच्या लोक जनशक्ती पक्षानेही (एलजेपी) या निवडणुकीत आश्चर्यकारक कामगिरी केल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.**

लोक जनशक्ती पक्षाला २९ जागा देण्यात आल्या होत्या, तर युतीतील मोठे भागीदार असलेल्या भाजपा आणि जेडीयूने प्रत्येकी १०१ जागा लढवल्या होत्या. आतापर्यंत आलेली आकडेवारी दर्शवते की, चिराग पासवान २९ पैकी २१ जागांवर आघाडीवर आहे.मुख्य बाब म्हणजे गेल्या विधानसभा निवडणुकीत चिराग पासवान यांच्या पक्षाला केवळ एकच जागा जिंकता आली होती. मात्र, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी ५ पैकी ५ जागा जिंकल्या होत्या. स्वतःला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे 'हनुमान' म्हणवणारे चिराग पासवान यंदाच्या विधानसभा निवडणुकीतही आपली छाप पाडत असल्याचे चित्र आहे. दुपारी १२.४५ वाजेपर्यंत, लोक जनशक्ती पक्ष पाच टक्क्यांपेक्षा जास्त मतांच्या वाट्यासह मगध, सीमांचल आणि पाटलीपुत्र



भागांतील अनेक जागांवर आघाडीवर आहे.लोक जनशक्ती पक्षाच्या या कामिगिरीमुळे भाजपा, जेडीयू आणि लहान मित्रपक्षांनाही मोठी ताकद दिली आहे. एनडीएला नेमकी याच एकीकरणाची अपेक्षा असावी. विशेष म्हणजे ही लोक जनशक्ती पक्षाची आजवरची सर्वात प्रभावी आणि जबरदस्त कामगिरी आहे.

२०20 च्या बिहार विधानसभा निवडणुकीत ते एकट्याने लढले होते आणि तेव्हा त्यांनी फक्त एकच जागा जिंकली होती. त्या तुलनेत ही एक थक्क करणारी कामगिरी आहे.२०२० च्या निवडणुकीत चिराग पासवान यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने १३७ जागांवर उमेदवार उभे केले होते आणि चिराग पासवान यांच्या नितीश यांच्याविरोधातील तीव्र प्रचारामुळे जेडीयूच्या मतांमध्ये फूट पडली होती. त्यामुळे जेडीयूचा जागांचा आकडा २०१५ मधील ७१ वरून थेट ४३ वर आला होता. आता, लोक जनशक्ती पक्ष २०२५ मध्ये एनडीएमध्ये पूर्णपणे समाविष्ट होऊन लढल्यामुळे,त्याबरोबरच 'व्होट ट्रान्सफर' सुरळीत झाल्यामुळे नितीश यांच्या नेतृत्वाखालील जेडीयूच्या जागा वाढविण्यातही मदत केली आणि एनडीएच्या एकूण जागांमध्येही वाढ केली आहे.

### निवडणुकीत आश्चर्यकारक कामगिरी

दीर्घकाळ चाललेला तणाव पाहता.बिहार विधानसभा निवडणुकीच्या निकालाचे सुरुवातीचे कल हाती आले असून एनडीए मोठ्या विजयाच्या दिशेने वाटचाल करत आहे आणि चिराग पासवान यांच्या लोक जनशक्ती पक्षानेही (एलजेपी) या निवडणुकीत आश्चर्यकारक कामगिरी केल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

# माधुरी माझ्यापेक्षा जास्त 'फेमस'; डॉ. नेने पत्नीविषयी काय म्हणाले?

माधुरी दीक्षितचे पती डॉ. श्रीराम नेनेंनी २०११ मध्ये अमेरिकेतील हार्ट सर्जनची नोकरी सोडून भारतात परण्याचा निर्णय घेतला होता. यंदाच्या जानेवारी महिन्यात आयएनकेच्या संस्थापक आणि सीईओ लक्ष्मी प्रॅटुरी यांनी आयोजित केलेल्या एका पॅनेलच्या चर्चेत डॉ. नेने सहभागी झाले होते. यावेळी त्यांनी वैयक्तिक आयुष्यातील बऱ्याच गोष्टींचा खुलासा केला. डॉ. नेनेंचा नोकरी सोडून भारतात येण्याचा निर्णय त्यांच्या आई-बाबांना त्यावेळी पटला नव्हता. याशिवाय माधुरीशी लग्न झाल्यानंतर आयुष्य पूर्णपणे बदलून गेलं असंही ते म्हणाले.डॉ. श्रीराम नेने UCLA ( कॅलिफोर्निया विद्यापीठ-लॉस एंजेलिस ) याठिकाणी हार्ट सर्जन म्हणून काम करायचे. त्यावेळी बऱ्याच सेलिब्रिटींवर उपचार केल्याचं त्यांनी सांगितलं. डॉ. नेने म्हणाले, "मी अनेक सेलिब्रिटींवर उपचार केले आहेत. माझं लग्न होण्याआधी सुद्धा मी बऱ्याच सेलिब्रिटींना



ओळखायचो. पण, लग्नाआधी बाहेरच्या जगात मला फारसं कोणीही ओळखत नव्हतं. माधुरीशी लग्न झाल्यावर परिस्थिती पूर्णपणे बदलली. आता प्रत्येकाला माझ्याबरोबर सेल्फी हवा असतो."डॉ. नेने पुढे म्हणाले, "माझी पत्नी माझ्यापेक्षा जास्त प्रसिद्ध आहे... आणि हे अगदी खरं आहे. मी फक्त जोडीदार म्हणून तिची साथ देतोय. वैयक्तिक आयुष्यात ती प्रचंड नम्र आहे. तिला त्यावेळी अमेरिकेत सुद्धा सर्वत्र ओळखलं जायचं. पण, मी कधीच तिच्याकडे एक अभिनेत्री म्हणून पाहिलं नाही कारण, ती माझी पत्नी आहे, माझी जोडीदार आहे.

## रेखा आरतीला कानशिलात लगावणार

बॉलीवूड अभिनेत्रींमध्ये असलेलं बॉन्डिंग आणि त्यांच्यात असलेली भांडणं ही नेहमीच सोशल मीडियावर चर्चेत असतात. त्यांच्या चाहत्यांना नेहमीच अभिनेत्रींच्या खऱ्या आयुष्यात काय होतंय हे जाणून घेण्याची इच्छा होते. असाच एक किस्सा स्वत: अभिनेत्रीनं सांगितला होता, तेव्हा सगळ्यांना मोठा धक्का बसला होता. हा किस्सा दिग्गज अभिनेत्री रेखा यांच्या संबंधित आहे. आरती छाबडिया ही लोकप्रिय अभिनेत्री आहे. आरती छाबडियाने १९९९ मध्ये मिस इंडिया वर्ल्डवाइडचा किताबही जिंकला आहे. तिने सुखविंदर सिंग यांच्या 'नशा ही नशा है' या गाण्याने आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली. यानंतर ती चित्रपटांमध्ये आली. तिने अनेक चित्रपटांमध्ये महत्त्वाच्या भूमिका साकारल्या आहेत.आरती छाबडिया आता सोशल मीडियावर फॅशन इन्फ्लुएन्सर म्हणून लोकप्रिय झाली आहे. आरतीनं 'लज्जा' सिनेमातून बॉलीवूडमध्ये एन्ट्री केली होती. या सिनेमात तिच्यासोबत माधुरी दीक्षित, अजय देवगण, रेखा यांच्यासह अनेक लोकप्रिय कलाकारांच्या भूमिका होत्या. या सिनेमाच्या सेटवरचा एक किस्सा सध्या चर्चेत आला आहे.एका सीनमध्ये आरतीला रेखा कानशिलात लगावणार होत्या, पण या गोष्टीची आरतीला कल्पना नव्हती. जेव्हा रेखा यांनी तिच्या कानाखाली मारली तेव्हा आरती ढसाढसा रडू लागली. या गोष्टीचा खुलासा स्वत: आरतीने एका मुलाखतीदरम्यान केला होता. तिने एका मुलाखतीत सांगितलं होतं की, 'लज्जा' चित्रपटाच्या सेटवर रेखा यांनी तिला कानाखाली मारली होती. रेखा यांनी शूटिंगदरम्यान तिला मारल्यानंतर ती ढसाढसा रडू लागली होती." आरतीची परिस्थिती पाहून सिनेमाचे दिग्दर्शक आणि रेखा यांनी तिला समजावलं होतं.

## काय माय जरातर लाजावं की...



नृत्यांगणा गौतमी पाटीलही तिच्या अदांनी आणि नृत्यांनी चात्यांना घायाळ करत असते. गौतमी वेगवेगळ्या कार्यक्रमांमध्ये तिची नृत्यशैली सादर करते. कोणत्या ना कोणत्या कारणांमुळे गौतमी चर्चेत असते. आता गौतमीनं सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये ती "सरकार तुम्ही केलंय मार्केट जाम" या गाण्यावर डान्स करताना दिसत आहे. गौतमीचा हा व्हिडीओ पाहिल्यानंतर मात्र आता नेटकरी तिच्यावर भडकले आहेत. गौतमीच्या व्हिडीओला कमेंट करुन अनेकांनी तिला ट्रोल देखील केलं आहे. गौतमीनं इन्स्टाग्रामवर तिचा "सरकार तुम्ही केलंय मार्केट जाम" या गाण्यावरील डान्सचा व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये गौतमी ही स्टेजवर काही लहान मुलींसोबत डान्स करताना दिसत आहे. लहान मुलींसोबत डान्स केल्यानंतर काही नेटकरी गौतमीला ट्रोल करत आहेत. एका नेटकऱ्यानं गौतमीला कमेंट केली, "तू नाच आणि अजून तुझ्या पुढे 10 तयार कर नाचायला. काय माय जरातर लाजावं की. देशाच भविष्य नाचवताना." तर दुसऱ्या युझरनं कमेंट केली, "लहान मुली आहेत एवढी तरी आकल ठेवा" काही नेटकऱ्यांनी गौतमीच्या व्हिडीओला कमेंट करुन तिला ट्रोल केलं तर काहींनी तिच्या नृत्यशैलीचं कौतुक देखील केलं. गौतमीच्या माझा कारभार सोपा नसतोय रं, दिलाचं पाखरू, सरकार तुम्ही केलंय मार्केट जाम,पाटलांचा बैलगाडा या गाण्यांना प्रेक्षकांची विशेष पसंती मिळाली. तिच्या गाण्यांवर नेटकरी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव करतात. गौतमी तिच्या गाण्यांचे व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर करत असते. तिला इन्स्टाग्रामवर 1.5 मिलियन फॉलोवर्स आहेत. काही दिवसांपूर्वी गौतमीचं 'घोटाळा झाला' हे गाणं या युट्यूब चॅनलवर शेअर करण्यात आलं आहे. या गाण्याला देखील नेटकऱ्यांची पसंती मिळाली. तसेच तिचा 'घुंगरु' हा चित्रपट देखील रिलीज झाला.या चित्रपटाचं दिग्दर्शन बाबा गायकवाडयांनी केलं आहे.नृत्यांगणा गौतमी पाटील ही तिच्या अदांनी आणि नृत्यांनी चात्यांना घायाळ करत असते. गौतमी वेगवेगळ्या कार्यक्रमांमध्ये तिची नृत्यशैली सादर करते. कोणत्या ना कोणत्या कारणांमुळे गौतमी चर्चेत असते.

## दत्तू मोरेने दिली आनंदाची बातमी!

'महाराष्ट्राची हास्यजत्रा' कार्यक्रमामुळे अनेक नवोदित कलाकार प्रसिद्धीझोतात आले. या शोचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. यापैकीच प्रेक्षकांचा लाडका अभिनेता म्हणजे दत्तू मोरे. दत्तूने नुकताच त्याच्या चाहत्यांना एक सुखद धक्का दिला आहे. लग्नानंतर दोन वर्षांनी अभिनेता बाबा झाला आहे. ही आनंदाची बातमी दत्तूने इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर करत सर्वांना दिली आहे. दत्तूच्या घरी चिमुकल्या सदस्याचं आगमन झालेलं आहे. अभिनेत्याला मुलगा झाला आहे. दत्तूने बाळाची पहिली झलक या पोस्टद्वारे शेअर केली आहे. यातील एका फोटोमध्ये दत्तू अन् त्याच्या पत्नीने लेकाचा हात अलगद आपल्या हातांवर धरल्याचं पाहायला मिळत आहे. तर, दुसऱ्या एका फोटोमध्ये दत्तूच्या लेकाने चिमुकल्या हातांनी बाबाचं बोट पकडल्याचं दिसतंय.दत्तूने हे गोड फोटो शेअर करत त्यावर "फायनली... तो आला! WE NOW OFFICIALLY HAVE A TINY HUMAN TO BLAME. माझ्या आयुष्यातील सर्वात मोठा क्षण...मी सदैव कृतज्ञ आहे." असं कॅप्शन दिलं आहे.दत्तूने गुडन्यूज शेअर करताच नेटकऱ्यांसह अभिनेत्याच्या चाहत्यांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. हास्यजत्रेतील कलाकारांनी सुद्धा कमेंट्समध्ये दत्तूवर शुभेच्छांचा पाऊस पाडला आहे.दरम्यान, २३ मे २०२३ रोजी दत्तूने गुपचूप लग्नगाठ बांधत नव्या आयुष्याला सुरुवात केली होती. त्याचं लग्न साध्या पद्धतीत पार पडलं होतं. दत्तूच्या पत्नीचं नाव स्वाती घुनागे ( मोरे ) असं आहे. स्वाती ही व्यवसायाने डॉक्टर आहे. ती स्त्रीरोग तज्ञ असून गेल्यावर्षी तिने ठाण्यात स्वतःचं क्लिनिक सुरू केलं होतं. याशिवाय स्वाती अनेक सामाजिक कार्यात सक्रीय असते.दरम्यान, सध्या संपूर्ण कलाविश्वातून या जोडप्यावर शुभेच्छांचा वर्षाव करण्यात येत आहे. या दोघांच्या लव्हस्टोरीबद्दल थोडक्यात सांगायचं झालं.



## सारा 'या' अभिनेत्याला करतेय डेट?

भारतीय संघाचा महान फलंदाज सचिन तेंडुलकरची लेक नेहमीच चर्चेत असते. सारा तेंडुलकर सोशल मीडियावर प्रचंड सक्रिय असते आणि तिच्या फोटो, व्हीडिओवर चाहते लाईक्स, कमेंटसचा चाहते पाऊस पाडतात. सारा तेंडुलकरचं नाव भारताचा क्रिकेटपटू गिलबरोबर जोडलं जात होतं. आता पुन्हा एकदा साराचे नाव याच कारणामुळे चर्चेत आहे. साराचं नाव आता बॉलीवूडमधील अभिनेत्याबरोबर जोडलं जातं. या अभिनेत्याला सारा डेट करत असल्याचा दावा एका रिपोर्टमध्ये केला आहे. शुबमन गिल आणि सारा तेंडुलकर एकमेकांना डेट करत असल्याची नेहमीच चर्चा होत असते. पण आयपीएलदरम्यान शुबमन गिलच्या मुलाखतीतील एका वक्तव्यामुळे या चर्चेला पूर्णविराम मिळाला. गिलला मुलाखतीत त्याच्या वैयक्तिक जीवनाबद्दल विचारले असता त्याने सांगितलं की तो गेली ३ वर्ष सिंगल आहे आणि त्याच्या क्रिकेट करियरवर लक्ष देत आहे. गिलच्या मुलाखतीतील वक्तव्यापूर्वी गिल आणि साराने एकमेकांना इन्स्टाग्रामवर अनफॉलो केल्याने त्यांच्या ब्रेकअपच्या चर्चा होत्या. तर गिलच्या वक्तव्यामुळे या चर्चाही थांबल्या. आता सारा तेंडुलकरचं नाव बॉलीवूड अभिनेत्याबरोबर जोडलं जात आहे.फिल्मफेअरमधील एका वृत्तानुसार, दिग्गज भारतीय फलंदाजाची लेक सारा तेंडुलकर अभिनेता सिध्दांत चतुर्वेदीला डेट करत आहे.

## सूर्यवंशीचं वादळी शतक

## कर्णधार जितेशच्या नेतृत्त्वाखाली असा मिळवला विजय

# भारत अ संघाचा युएईवर मोठा विजय!

## भारताचा युएईवर दणदणीत विजय



। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आशिया चषक रायझिंग स्टारमधील पहिल्याच सामन्यात भारतीय संघाने मोठा विजय मिळवला आहे. भारताच्या अ संघाने वैभव सूर्यवंशी व कर्णधार जितेश शर्माच्या वादळी खेळीच्या जोरावर युएई संघावर तब्बल १४८ धावांनी विजय मिळवला. गोलंदाजीत गुर्जपनीत सिंगने ३ विकेट्स घेतल्या. तर भारताच्या इतर गोलंदाजांनीही त्याला चांगली साथ दिली. भारताचा आता पुढील सामना पाकिस्तान अ संघाविरूद्ध होणार आहे.**

भारतीय संघाने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. वैभव सूर्यवंशीचं शतक व जितेश शर्माच्या वादळी खेळीच्या जोरावर भारताने २० षटकांत ४ बाद २९७ धावा केल्या. प्रत्युत्तरात युएईचा संघ ६ बाद १५० धावाच करू शकला. यासह भारताने १४८ धावांनी मोठ्या विजयाची नोंद केली. युएईचा संघ २९८ धावांचा पाठलाग करण्यासाठी मैदानावर उतरला. युएईच्या सलामीवीरांना हर्ष दुबे व गुर्जपनीत सिंगने माघारी धाडलं. तर सोहेब खानने ४१ चेंडूत ३ चौकार, ६ षटकारांसह ६३ धावांची झटपट खेळी केली. याशिवाय कोणताच फलंदाज ३० धावाही करू शकला नाही. भारताकडून गुर्जपनीत सिंगने सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या. गुर्जपनीतने ४ षटकांत १८ धावा देत ३ विकेट्स घेतल्या. तर हर्ष दुबेने २ विकेट्स आणि रमणदीप, यश ठाकूरने प्रत्येकी १-१ विकेट घेतली.तत्पूर्वी प्रथम फलंदाजीसाठी उतरलेल्या भारतीय संघाने २९७ धावांचा डोंगर उभारला. वैभव सूर्यवंशीने एकट्याने १४४ धावांची खेळी केली. वैभवने ३२ चेंडूत शतक झळकावल्यानंतर ४२ चेंडूत ११ चौकार व १५ षटकारांसह १४४ धावा केल्या. यानंतर नमन धीरने २३ चेंडूत ३ चौकार, २ षटकारांसह ३४ धावांची खेळी केली. तर कर्णधार जितेश शर्मने ३२ चेंडूत ८ चौकार व ६ षटकारांसह झटपट ८३ धावा करत संघाला मोठी धावसंख्या गाठण्यात मदत केली. याशिवाय भारताकडून नेहाल वधेराने १४ धावा, रमणदीपने नाबाद ६ धावा व प्रियांश आर्यने १० धावा केल्या. आशिया चषक रायझिंग स्टार २०२५ मध्ये भारताचा पुढील सामना पाकिस्तान अ संघाविरूद्ध होणार आहे. हा सामना १६ नोव्हेंबरला भारतीय वेळेनुसार रात्री ८ वाजता सुरू होणार आहे.आशिया चषक रायझिंग स्टारमधील पहिल्याच सामन्यात भारतीय संघाने मोठा विजय मिळवला आहे. भारताच्या अ संघाने वैभव सूर्यवंशी व कर्णधार जितेश शर्माच्या वादळी खेळीच्या जोरावर युएई संघावर तब्बल १४८ धावांनी विजय मिळवला. गोलंदाजीत गुर्जपनीत सिंगने ३ विकेट्स घेतल्या. तर भारताच्या इतर गोलंदाजांनीही त्याला चांगली साथ दिली. भारताचा आता पुढील सामना पाकिस्तान अ संघाविरूद्ध होणार आहे. भारतीय संघाने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. वैभव सूर्यवंशीचं शतक व जितेश शर्माच्या वादळी खेळीच्या जोरावर भारताने २० षटकांत ४ बाद २९७ धावा केल्या. प्रत्युत्तरात युएईचा संघ ६ बाद १५० धावाच करू शकला. यासह भारताने १४८ धावांनी मोठ्या विजयाची नोंद केली. युएईचा संघ २९८ धावांचा पाठलाग करण्यासाठी मैदानावर उतरला. युएईच्या सलामीवीरांना हर्ष दुबे व गुर्जपनीत सिंगने माघारी धाडलं. तर सोहेब खानने ४१ चेंडूत ३ चौकार, ६ षटकारांसह ६३ धावांची झटपट खेळी केली. याशिवाय कोणताच फलंदाज ३० धावाही करू शकला नाही. भारताकडून गुर्जपनीत सिंगने सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या. गुर्जपनीतने ४ षटकांत १८ धावा देत ३ विकेट्स घेतल्या. तर हर्ष दुबेने २ विकेट्स आणि रमणदीप, यश ठाकूरने प्रत्येकी १-१ विकेट घेतली.तत्पूर्वी प्रथम फलंदाजीसाठी उतरलेल्या भारतीय संघाने २९७ धावांचा डोंगर उभारला. वैभव सूर्यवंशीने एकट्याने १४४ धावांची खेळी केली. वैभवने ३२ चेंडूत शतक झळकावल्यानंतर ४२ चेंडूत ११ चौकार व १५ षटकारांसह १४४ धावा केल्या. यानंतर नमन धीरने २३ चेंडूत ३ चौकार, २ षटकारांसह ३४ धावांची खेळी केली. तर कर्णधार जितेश शर्मने ३२ चेंडूत ८ चौकार व ६ षटकारांसह झटपट ८३ धावा करत संघाला मोठी धावसंख्या गाठण्यात मदत केली. याशिवाय भारताकडून नेहाल वधेराने १४ धावा, रमणदीपने नाबाद ६ धावा व प्रियांश आर्यने १० धावा केल्या.२०२५ मध्ये भारताचा पुढील सामना पाकिस्तान अ संघाविरूद्ध होणार आहे.

### जितेश शर्माच्या वादळी खेळी

हा सामना १६ नोव्हेंबरला भारतीय वेळेनुसार रात्री ८ वाजता सुरू होणार आहे.आशिया चषक रायझिंग स्टारमधील पहिल्याच सामन्यात भारतीय संघाने मोठा विजय मिळवला आहे. भारताच्या अ संघाने वैभव सूर्यवंशी व कर्णधार जितेश शर्माच्या वादळी खेळीच्या जोरावर युएई संघावर तब्बल १४८ धावांनी विजय मिळवला. गोलंदाजीत गुर्जपनीत सिंगने ३ विकेट्स घेतल्या. तर भारताच्या इतर गोलंदाजांनीही त्याला चांगली साथ दिली.

# अवघ्या ३२ चेंडूत झळकावलं वादळी शतक

## 42 चेंडूत 11 चौकार व 16 षटकारांची झंझावती खेळी



। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**रायझिंग स्टार आशिया कप २०२५ स्पर्धेला सुरुवात झाली आहे. या स्पर्धेत भारतीय संघ जितेश शर्माच्या नेतृत्वाखाली खेळत आहे. भारतीय संघ युएईविरुद्ध सामन्याने मोहिमेची सुरुवात केली आहे. पहिल्याच सामन्यात सलामीवीर वैभव सूर्यवंशीने शतकी खेळी करत गोलंदाजांचा धुव्वा उडवला.**

दोहामधील वेस्ट एन्ड पार्क इंटरनॅशनल स्टेडियममध्ये हा सामना खेळवला जात आहे. भारत अ संघाने सामन्याची नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. जो संघासाठी अगदी योग्य ठरला आणि भारताने २९७ धावांचा डोंगर उभारला. सूर्यवंशीच्या शतकासह भारताच्या इतर फलंदाजांनीही महत्त्वपूर्ण योगदान दिलं आहे. वैभव प्रियांश आर्यसह सलामीला उतरले. प्रियांश १० धावा करत धावबाद झाला. पण यानंतर वैभव सूर्यवंशीने गोलंदाजांची शाळा घ्यायला सुरुवात केली. त्याने सुरुवातीला अवघ्या १७ चेंडूत अर्धशतक झळकावलं. इतक्यावर तो थांबला नाही, यानंतर त्याने चौकार षटकारांचा पाऊस पाडत अवघ्या ३२ चेंडूत शतक पूर्ण करत वादळी खेळी साकारली.शतकानंतरही वैभव सूर्यवंशीची बॅट थांबली नाही, त्याने एका षटकात ३० धावा चोपत झपाट्याने संघाच्या धावसंख्येत भर घातली. वैभव झेलबाद होण्यापूर्वी त्याने ४२ चेंडूत ११चौकार व १६ षटकारांच्या मदतीने १४४ धावांची शानदार खेळी केली.वैभव सूर्यवंशी व नमन धीर यांनी १५० अधिक धावांची भागीदारी रचली. षटकारांसह ३४ धावांची खेळी केली. जितेशच्या वादळी खेळीसह भारताने २० षटकांत ४ बाद २९७ धावा केल्या आहेत.

### आशिया कप २०२५ स्पर्धेला सुरुवात

१४ वर्षीय वैभव सूर्यवंशी उत्कृष्ट फॉर्मात असून त्याने गेल्या काही काळात उत्कृष्ट खेळी केल्या आहेत. आयपीएलमध्ये शतक केल्यानंतर त्याने युथ वनडे आणि युथ टेस्टमध्येही शतकी खेळी केली. यानंतर आता त्याने भारतीय अ संघाकडून खेळताना शतक झळकावत शतकांचा सिलसिला कायम ठेवला आहे. रायझिंग स्टार आशिया कप २०२५ स्पर्धेला सुरुवात झाली आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। शनिवार।

। दि. 15 नोव्हेंबर 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## भाजपा युवा मोर्चाकडून आयोजित

# क्रीडा स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद!

### आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजन; दिनेश यादव यांचा पुढाकार



। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**हिंदुत्ववादी आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष दिनेश यादव यांच्या पुढाकाराने आणि शेठ माणिकचंद फाउंडेशन संचलित विश्व कल्याण इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजतर्फे आयोजित शालेय क्रीडा स्पर्धांना उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये भरभरून सहभाग नोंदवला.**

या स्पर्धा पूर्णानगर येथील शनी मंदिर ग्राउंडवर आयोजित केल्या होता.कार्यक्रमाला सामाजिक कार्यकर्ते आणि कामगार नेते सचिन लांडगे, इंद्रायणी महिला प्रतिष्ठानच्या अध्यक्षा निशा यादव उपस्थित होत्या. आयोजन भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष दिनेश यादव यांच्या पुढाकाराने करण्यात आले.

यावेळी सचिन लांडगे म्हणाले या स्पर्धा भरविल्याबद्दल आयोजकांचे कौतुक करावे लागेल. सध्याच्या परिस्थितीत विद्यार्थ्यांना मैदानाकडे वळवणे हे मोठे जिकरीचे काम झाले आहे. स्मार्ट मोबाइलमुळे विद्यार्थ्यांचा स्क्रीन टाईम मोठ्या प्रमाणात वाढला आहे. अशा वेळेला पारंपारिक मल्लखांब, दांडपट्टा, लाठीकाठी,फायर जम्प, कराटे, मार्शल आर्ट्स आणि इतर खेळांची या विद्यार्थ्यांना गोडी लावणे अत्यंत आवश्यक आहे. दिनेश यादव आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या प्रकारच्या स्पर्धा भरून विद्यार्थ्यांना मैदानाकडे पुन्हा एकदा येण्यासाठी मार्ग उपलब्ध करून दिला आहे.

> “ विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी खेळ महत्त्वाचे आहेत. सध्या अनेक पारंपरिक खेळ लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. हे पारंपारिक खेळच पुढील अनेक महत्त्वाच्या खेळांचे ‘बेस’ आहेत. त्यामुळे या खेळांना राजाश्रय मिळवून देणे. विद्यार्थ्यांमध्ये खेळाची आवड निर्माण करणे हाच एक मुख्य हेतू होता.
> **-दिनेश यादव,** अध्यक्ष भारतीय जनता युवा मोर्चा

## पिंपरी-चिंचवड निवडणूक प्रचार प्रमुख पदी नाना काटे यांची नियुक्ती!

### मिशन-PCMC: महापालिका निवडणुकीत भाजपा-राष्ट्रवादीत आता ‘काँटे की टक्कर’

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवडः विशेष प्रतिनिधी । राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्षाच्या आगामी होऊ घातलेल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका 2025-2026 निवडणूकीकरिता प्रचार प्रमुख पदी माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांची आज (दि. 14) नियुक्ती करण्यात आली. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या सुचनेनुसार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी निवडीचे पत्र दिले.**

पिंपरी चिंचवड हा राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला पुन्हा काबिज करण्याकरिता व तो अधिकाधिक मजबूत रहावा या दृष्टीकोनातून प्रचार प्रमुख पदी नाना काटे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नाना काटे हे राष्ट्रवादीचे माजी नगरसेवक, माजी विरोधी पक्षनेते असून पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा आगामी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या अतिशय महत्त्वपूर्ण जबाबदारीसाठी राष्ट्रवादीकडून जबाबदारीचे स्थान देण्यात येत आहे, अशी माहिती शहराध्यक्ष योगेश बहल यांनी दिली.



## ताथवडे येथील पशुसंवर्धन विभागाची

# 15 एकर शासकीय जमीन बिनबोभाट लाटली!

### आणखी एक जमीन घोटाळा उघड; सहाय्यक दुय्यम निबंधकांचे निलंबन

| पिंपरी चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड: पिंपरी चिंचवड परिसरातील ताथवडे येथील पशुसंवर्धन विभागाची 15 एकर शासकीय जमीन बेकायदेशीरपणे विक्री झाल्याचा मोठा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात पशुसंवर्धन विभागाने पोलिसांकडे तक्रार दाखल केली असून, या घोटाळ्यात 22 वारस तसेच खरेदीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान यामध्ये सहाय्यक दुय्यम निबंधकांचे निलंबन करण्यात आले आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हे निलंबनाचे आदेश दिले आहेत.**




पुण्यातील मुंढवा येथील मूळची महार वतनाची आणि सध्या सरकारच्या ताब्यात असलेली ४० एकर जागा जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी न घेता तसंच मुद्रांक शुल्क बुडवून परस्पर विकल्याचं प्रकरण ताजे असतानाच पुणे जिल्ह्यातील आणखी एका सरकारी जमिनीचा घोटाळा समोर आल्यानं खळबळ उडाली आहे. ही जमीनही सरकारला अंधारात ठेवून त्यांची परस्पर विक्री झाल्याचा प्रकार घडला आहे. ताथवडे इथली १५ एकर जमिनीची बेकायदा विक्री झाल्याची तक्रार पशुसंवर्धन खात्यानं पुणे विभागीय आयुक्तांकडं केली आहे. या विक्री प्रकरणात निबंधक कार्यालयातील गंभीर अनियमितता उघड झाल्याने सहाय्यक दुय्यम निबंधक विद्या बडे या महिला कर्मचाऱ्याला निलंबित करण्यात आले आहे. हवेली क्रमांक 17 येथील निबंधक कार्यालयात दस्त क्र. 685/2025 या खरेदीखताच्या नोंदणीदरम्यान अनेक त्रुटी आढळल्या. दस्त नोंदणी करताना अद्ययावत सातबारा न जोडता जुना सातबारा उतारा स्वीकारण्यात आला. यामुळे जमीन पशुसंवर्धन विभागाच्या ताब्यात असल्याची आणि विक्रीवर बंदी असल्याची नोंद दुर्लक्षित झाली. याशिवाय संबंधित कर्मचाऱ्याने भोगवटादार हेरंब गुपचूप आणि वारसांची नोंद आणि इतर अधिकारात असलेल्या नोंदी 'स्किप' करून दस्त नोंदणी पूर्ण केली. या निष्काळजीपणामुळे कोट्यवधींच्या शासकीय जमिनीची बेकायदेशीर विक्री नोंदवली गेली........

पिंपरी-चिंचवड भागातील ताथवडे येथील राज्य सरकारच्या पशुसंवर्धन खात्याच्या मालकीची १५ एकर जमीन खात्याला अंधारातून ठेवून परस्पर विकली गेली आहे. या व्यवहाराची कागदपत्रे देखील तयार करण्यात आली आहेत. अकरा महिन्यांपूर्वी हा बेकायदा जमीन विक्रीचा प्रकार घडला आहे. विक्री व्यवहाराचा दस्त झाल्याची माहिती पशुसंवर्धन खात्याला मिळाल्यानंतर खात्यानं विभागीय आयुक्तांकडे तक्रार केली. तक्रार आल्यानंतर विभागीय आयुक्तांनी नोंदणी व मुद्रांक विभागाला याबद्दल विचारणा केली, त्यानंतर खरेखरच हा बेकायदा विक्रीचा धक्कादायक व्यवहार समोर आला.

**बिनबोभाट व्यवहार**

ताथवडे येथे पशुसंवर्धन खात्याची ७२ हेक्टर (सुमारे १७८ एकर) जागा आहे. त्यातील एका गटातील पंधरा एकर जागेवर पशुसंवर्धन खात्याचे नाव इतर अधिकारात आहे. त्यामुळं खात्याच्या परवानगीशिवाय जमिनीचा व्यवहार करता येत नाही. तरीही जानेवारीमध्ये या व्यवहाराला सुरुवात झाल्याचे समोर आलं आहे. संबंधित जागा हेरंब गुपचूप यांच्या खासगी मालकीची असली, तरी इतर अधिकारात पशुसंवर्धन खात्याची नोंद आहे. या जागेसंदर्भात हायकोर्टात मालकाने दावा दाखल केला होता. त्या दाव्याच्या निकालात कोर्टानं मालकीसंदर्भात कोणतेही भाष्य केलेलं नाही. त्यामुळं सातबारा उताऱ्यावर इतर अधिकारात पशुसंवर्धन खात्याचं नाव कायम राहिलं. तरीही जानेवारी २०२५ मध्ये गुपचूप यांनी या जागेचा विक्रीचा व्यवहार केला.

### सहाय्यक दुय्यम बडे निलंबित!

पुण्यात मुंढव्यातील ४० एकर आणि बोपोडीतील १३ एकर सरकारी जमिनींचा व्यवहार गाजत असतानाच ताथवडेतील हा तिसरा १५ एकर सरकारी जमीन विक्रीचा बेकायदा प्रकार उघडकीस आला आहे. दरम्यान, या प्रकरणी सहाय्यक दुय्यम निबंधक विद्या बडे यांचं निलंबन करण्यात आलं आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हे निलंबनाचे आदेश दिले आहेत. त्यांची चौकशी सुरू आहे. निलंबनाच्या काळात त्यांना मुख्यालय मुंबई येथे राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या काळात कोणतीही खाजगी नोकरी किंवा व्यवसाय करण्यास मनाई असून, नियमांचे उल्लंघन केल्यास पुढील कारवाई केली जाणार आहे असे आदेशात म्हटले आहे.

## दृष्टिहीन विद्यार्थ्यांसोबत लुटला बाल दिनाचा आनंद!

### शिक्षण विश्व: मास्टर माइंड ग्लोबल स्कूलचा कौतुकास्पद उपक्रम

| पिंपरी चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मबालदिनानिमित्त दृष्टिहीन विद्यार्थ्यांसोबत गप्पा, गोष्टी आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमातून बाल दिनाच्या मजेचा आनंद घेण्यात आला..**

मास्टर माइंड ग्लोबल स्कूलच्या मुख्याध्यापिका डॉ.प्रदीपा नायर यांच्या पुढाकारातून भोसरी येथे बालदिन उत्साहात साजरा करण्यात आला. या विशेष दिवशी पताशिबाई लुंकड अंध विद्यालयातील दृष्टिहीन विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. त्यांना शुभेच्छा पत्र देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.

दृष्टिहीन विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने आणि कलागुणांनी उपस्थितांचे मन जिंकले. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांनी प्रेरणादायी विचार मांडत शारीरिक मर्यादा या यशाचे अडथळे नसतात असा संदेश दिला आणि सकारात्मकता तसेच मेहनतीचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

शाळेतील विद्यार्थ्यांनी नृत्य गीत नाटिका कविता आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून वातावरण रंगवले. सर्व विद्यार्थ्यांना लाडूंचे वाटप करण्यात आले.

**सहकार्याची भावना दृढ करणे महत्त्वाचे!**

कार्यक्रमाच्या शेवटी मुख्याध्यापक डॉ प्रदीपा नायर यांनी प्रमुख पाहुण्यांचे आभार मानले आणि अशाप्रकारचे उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये संवेदनशीलता सामाजिक बांधिलकी आणि सहकार्याची भावना दृढ करतात असे सांगितले.






Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!

8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046